# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र. ४८९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः–०९/०८/२०१६.

**१) घरातील एलईडी टीव्हीची व किराणा सामानाची चोरी . :–**

दिनांक ०६/०८/२०१६ ते ०८/०८/२०१६ रोजी चे ०८.०० वा. दर. यातील फिर्यादी संदीप जिवन बांते वय ३० वर्ष, रा. राजीव नगर बेला भंडारा हे बाहेरगावी कुटुंबासह घराला ताला लावुन गेले असता कोणीतरी अज्ञात चोराने समोरील दाराचा ताला तोडुन आत प्रवेश करून हायर कंपनीची एलईडी टीव्ही ३२ इंच कि. २५,०००/–रू. व किराणा सामान कि. ५००/–रू. असा एकुण २५,५००/–रू. चा माल चोरून नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५४,४५७,३८० भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. उबाळे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**२) ट्रॅक्टर चालकाच्या निष्काळजीपणाने, एक गंभिर जखमी . :–**

दिनांक ०४/०८/२०१६ रोजी १९.०० वा. दर. यातील अज्ञात आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील ट्रॅक्टरला केजव्हील लावलेला भरधाव वेगाने, निष्काळजीपने, लापरवाहीने चालवुन जखमी देवीराम उईके वय ३० वर्ष रा. गणेशपुर याच्या मोटार सायकलला धडक मारून उजवे पाय फॅक्चर करून गंभिर जखमी केला. असे फिर्यादी अमित नारायन सराटे वय ३० वर्ष, रा. गणेशपुर यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २७९,३३७,३३८ भादंवि सहकलम १३४,१८७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कळंबे पो.स्टे. तुमसर हे करीत आहे.

**३) अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी. :–**

दिनांक ०९/०८/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. कारधा, तुमसर, आंधळगाव, अडयाळ, भंडारा, पालांदुर, व पवनी येथील परीसरातील अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ११ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ४० लिटर हातभट्टी दारू कि. ३,८९०/रु. व ६०० मिली. लिटर देशी दारु. कि. १५०/रु. तसेच जुगारातुन कि. १,९७६/– रु. असा एकुण कि. ६,०१६ /–रू. चा माल जप्त करण्यात आला.

( श्री.बी.आर.गाडे)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती

प्रत, **संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.